# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

**प्रेसनोट ३१४ - २३** **दिनांक : - १५/०९/२०२३**

**अपहरीत झालेल्या ३०,३०० टन कच्चे बेस ऑईल पैकी २७ टन (२७ लाख रुपये किंमतीचा) कच्चे बेस ऑईल हस्तगत करुन तक्रारदार यास परत करण्यास नायगाव पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेस यश.**

नायगाव पोलीस ठाणे हद्दीत दि.३०.०८.२०२३ रोजी सायंकाळी ०६.४८ वा.ते. दि. ३१.०८.२०२३ रोजी सायंकाळी ६.०० वा.चे.मुदतीत. विक्रांत रोडवेज चे मालक सुजीत अभिराम झा रा. वर्धमान वाटीका, तत्वज्ञान विद्यापिठ ठाणे पश्चिम यांने टँकर नं.एम.एच.०४/जि.आर.८१८० वरील चालक बिर्जेश यादव याचे सोबत संगनमत करुन रोझरी बायोटेक लिमिटेड,कांजूरमार्ग यांचेद्वारे आमचे मागणीप्रमाणे व इ.वे.बिल नं. २६१६४०१५१६२६ अन्वये विक्रांत रोडवेज कडील टँकरनं.एम.एच.०४/जि.आर.८१८० मधून पाठविलेला ३०,५६,९६७/- रुपये किंमतीचा ३०,३०० मेट्रीक टन कच्चे मटेरियल (बेस ऑईल) या वर्णनाच्या मालाचा कोठेतरी वासलात लावून अपहार केल्याबाबत १) सुजीत अभिराम झा रा. वर्धमान वाटीका, तत्वज्ञान विद्यापिठ ठाणे पश्चिम व २) बिर्जेश यादव याच्या विरुध्द गुन्हा नोंद क्र. I २६७/२०२३ भा.दं.वि.सं.१८६० चा अधिनियम कलम ४०६,४०७,४०९,३४ प्रमाणे दाखल होता.

सदर गुन्हयाचे तपासाचे अनुषगांने तांत्रीक विश्लेषणाचे आधारे तसेच गुप्त बातमीदारा मार्फत मिळालेल्या माहीतीच्या आधारे गुन्हयात अपहरीत झालेले कच्चे मटेरियल (बेस ऑईल) पैकी एकुण २७ टन (२७ लाख रुपये किंमतीचा) कच्चे मटेरियल (बेस ऑईल) हस्तगत करुन फिर्यादी यांना परत केला आहे. नमुद गुन्हयातील गेल्या मालापैकी ९० टक्के माल हा हस्तगत करण्यात नायगाव पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेस यश मिळाले आहे.

वरील कामगीरी श्रीमती पौणिमा चौगुले पोलीस उप आयुक्त, परीमंडळ - २ वसई, श्रीमती. पदमजा बडे, सहाय्यक पोलीस आयुक्त वसई विभाग , नायगाव पोलीस ठाणे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. रमेश भामे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. सागर टिळेकर, यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटिकरण शाखेचे,स.पो.नि.रोशन देवरे, स.पो.नि.गणेश केकान, पो.हवा. देविदास पाटील, पो.अंम. सचिन मोहीते, सचिन खताळ, जयवंत खंडवी,अमर पवार, चेतन ठाकरे,अशोक पाटील यांनी यशस्वीरित्या कामगीरी पार पाडली आहे.





----0000----